# हवं ते हव्यास

श्रीमद् नामचैतन्य भानुदास
दि. १८–११–२००८
दैनिक सकाळ, मुंबई यांच्या सौजन्याने

प्रत्येक प्राणी जन्माला येताना हवं घेऊनच येतो. प्रत्येकाला जिवंत राहण्यासाठी अन्न हवं, पाणी हवं आणि प्राणवायुही हवाच. ऊन–पावसापासून संरक्षण होण्यासाठी आणि विश्रांतीसाठी निवारा देखील हवाच. मानवाला मात्र अन्न आणि निवाऱ्याव्यतिरिक्त वस्त्रदेखील हवं असतं. मानवाव्यतिरिक्त इतर प्राण्यांना हवं ते मिळालं की ते समाधानी राहतात. मानवाला मात्र हवं ते मिळालं की त्याचं समाधान होतं, पण ते क्षणिक असतं. त्या व्यतिरिक्त मानवाला अन्न, वस्त्र, निवाऱ्यासाठी द्रव्यार्जन करणं आवश्यक ठरतं. द्रव्य असेल तरच हवं ते घेता येतं. मग जे मिळालंय ते किंवा त्या व्यतिरिक्त इतरही हवं हवसं वाटू लागतं. त्यासाठी द्रव्यार्जन वाढवण्याची आवश्यकता भासू लागते. जास्त पगाराची नोकरी शोधणं, ओव्हरटाईम करणं, कुटुंबातील जास्तीतजास्त सदस्यांनी नोकरी करणं वगैरे मार्गाचा अवलंब होऊ लागतो. ऐहिक सुख मिळालं की आपण समाधानी होऊ, या भ्रमात मानव असतो. खरं म्हणजे, ऐहिक सुखावर अवलंबून असलेलं समाधान हे कायम स्वरूपी समाधानी अवस्था कधीच प्राप्त करून देत नाही. कारण सुख हे क्षितिजासारखं असतं. सुखाच्या एका टप्प्यावर पोचावं तर पुढच्या सुखाची अपेक्षा सुरू होते. सुख शरीराला मिळत असलं तरी समाधान मात्र मनाला मिळतं. जीवनातील सुखाच्या संकल्पनांच्या मर्यादा वाढू लागल्या की, लाईफ स्टाईल बदलावीशी वाटू लागते. अर्थातच त्यासाठी सुरू होते ती द्रव्याची हाव. भौतिक विज्ञानाच्या प्रगतीबरोबरच सुखदायी वस्तुंची रेलचेल झाली आहे आणि त्या वस्तू जीवनावश्यकच होऊ लागल्या आहेत. परिणामी त्या वस्तुंचा आणि पर्यायाने द्रव्याचा हव्यास सुरू झाला. मानवाला हवं तेवढंच मिळत होतं, त्यावेळी मानव समाधानी होता. हवहवसं वाटू लागलं आणि तो विचलित झाला. जशी हाव वाढू लागली, तशी मनाची घालमेल होऊ लागली. माणसाचा हव्यास सुरू झाला आणि तो हव्यास मानसिक तणावाला कारणीभूत ठरू लागला. बाह्य प्रलोभनं निर्माण केली ती मानवानेच आणि हव्यासाला बळी पडला तोही मानवच!